गौण खनिजाच्या नियमावलीत सुधारणा
करण्याबाबत समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०७२६/प्र.क्र.२१५/ख-२/ई-१७४४०९२
पहिल मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- २४ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :१.महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८
२.महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
३.महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. गौखनि-१०/०१२०/प्र.क्र.१७/ख-२, दि.०३.०५.२०२१
४.महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.गौखनि-१०/०३२६/प्र.क्र.०८९/ख-२/ ई-१५९८००६, दि.१९.०५.२०२६
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.गौखनि-१०/०७२६/प्र.क्र.२१५/ख-२/ ई-१७४४०९२, दि.०८.०७.२०२६

प्रस्तावना:-

सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशनामध्ये महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये श्री. सुनिल प्रभु व इतर, विधानसभा सदस्य यांनी "वसई-विरार पूर्वेकडील शिरगाव रायपाडा येथील जमिनीत दगडखाणीत बेकायदा पध्दतीने स्फोट घडवून अवैध उत्खनन" या विषयाबाबत लक्षवेधी सूचना क्रमांक ६३ उपस्थित करण्यात आलेली होती. सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिनाक ०७.०७.२०२६ रोजी सभागृहात झालेल्या चर्चेवेळी विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत उत्तर देताना मा. मंत्री (महसूल) यांनी गौण खनिजाच्या स्वामित्वधनाच्या रकमा शासन जमा करण्याची पद्धत सुलभिकरण करणे व दंडात्मक रकमेची वसुली कशा पद्धतीने करता येईल यासाठी शिफारशी व सूचना प्राप्त करुन घेऊन गौण खनिजाच्या नियमावलीत सुधारणा करण्याबाबत विधानसभा सदस्यांची समिती गठीत करण्याबाबत आश्वस्त करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभा सदस्यांची “गौण खनिजाच्या नियमावलीत सुधारणा करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक ०५, दिनांक ०८.०७.२०२६ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुषंगाने समितीने त्यांच्या शिफारशी दिनाक १५.०८.२०२६ पर्यंत शासनास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर शिफारशी दिनांक १५.०८.२०२६ रोजीपर्यंत शासनास सादर करणे शक्य नसल्याने त्यास दिनांक १५.११.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

शासन निर्णय:-

गौण खनिजाच्या नियमावलीत सुधारणा करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक ०५, दिनांक ०८.०७.२०२६ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. समितीने गौण खनिजाच्या नियमावलीत सुधारणा करण्याबाबतच्या शिफारशी शासनास सादर करण्याबाबत दिनांक १५.११.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२४११५३४९८६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SADANAND GOVIND MOHITE

Digitally signed by SADANAND GOVIND MOHITE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=9BD008875B6A3A9FDDAD3E55FE0328DF13A27221CB2BBC67ABD0155F914EFC01, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6590E2301450C474B246074049174C79201BCAD9E5EB15E8F21C282EAEFEDA38, cn=SADANAND GOVIND MOHITE
Date: 2026.08.24 11:54:40 +05'30'

(सदानंद गो. मोहिते)

कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (उत्पादन शुल्क), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा. विधानसभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
६. मा. विधानपरिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई
७. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा. मंत्री/मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
९. सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक
१४. सर्व उपविभागीय अधिकारी
१५. सर्व तहसिलदार
१६. निवडनस्ती (ख-२ कार्यासन)